RNI NO. MAHMAR/2020/84035

रोज वाचा Digital Bahujan Saurabh https://bahujansaurabh.com

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रोज वाचा Digital Bahujan Saurabh https://bahujansaurabh.com

सोमवार, ४ सप्टेंबर २०२३ | वर्ष : ३ | अंक : २४७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Monday, 4 September 2023 | Year : 3 | Issue : 247 | Daily | Rate: Rs. 5/-

# संतप्त मराठा

## जमावाने सरकारी गोदामाला लावली आग



**हिंगोली :** जालन्यात मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमार प्रकरणाचे संपूर्ण राज्यभर पडसाद उमटत आहेत. हिंगोली जिल्ह्यातही याचे पडसाद उमटले असून काही ठिकाणी जाळपोळ झाल्याच्या घटना घडल्या आहेत. शनिवारी सेनगाव येथे धान्याच्या शासकीय गोदामास आग लावण्यात आली. तसेच शासकीय वाहनही जाळण्यात आले. या घटनेत एकूण 3 लाख 88 हजार 600 रुपयाचे नुकसान झाले. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आज हिंगोली जिल्ह्यात ठिकठिकाणी रस्ता रोको करण्यात आले. तर सेनगाव येथे दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला. रविवारी आखाडा बाळापूर, दिग्रस आमि कऱ्हाळे येथे रास्ता रोको झाले. सोमवारी मराठा समाजाने हिंगोली जिल्ह्यात बंदची हाक दिली आहे. उद्याचा बंद शांततेत पार पडावा, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीधर यांनी मराठा समाजाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची रविवारी बैठक घेतली.सेनगाव येथे अज्ञातांनी रास्त भाव दुकानाच्या शासकीय गोदामास आग लावली. यामध्ये बारदाना 21 हजार पोते, तांदळाने भरलेले 102 कट्टे जळून खाक झाले. यामध्ये एकूण 2 लाख 88 हजार 600 रुपयांचे नुकसान झाले. तसेच संतप्त आंदोलकांनी तहसील कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या सरकारी वाहनाला आग लावली. यामध्ये एक लाखाचे नुकसान झाले.

## आंदोलनकर्त्यांनी 19 बसेस पेटवल्या; एसटी महामंडळाला अंदाजे 4 कोटींचे नुकसान



**मुंबई :** जालन्यातील लाठीमाराच्या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तब्बल 19 बसेसची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आल्याची माहिती आहे. एसटी महामंडळाचे जवळपास 4 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे महामंडळातील अधिकाऱ्यांनी माहिती दिली. रविवारीही जालन्यात वातावरण तणावाचे असल्याने जालन्यातील बस सेवा बंद ठेवण्यात आली आहे. जालन्यातील अंतरवाली सराटी येथे आंदोलकांवर पोलिसांनरी लाठीमार केला. राज्यातून निषेध व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात आला. या घटनेमुळे मराठा आंदोलक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

## जालन्यात आजही मराठा समाज आक्रमक

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथील अंतरवाली सराटी येथे करण्यात येत असलेल्या आंदोलकांवर करण्यात आलेल्या लाठीचार्जच्या घटनेच्या निषेधार्थ राज्यभरात संतापाचे वातावरण पाहायला मिळत आहे. औरंगाबादच्या एका तरुणाने आपली चारचाकी पेटवून दिल्याची घटना ताजी असतानाच आज जालना येथील एकाने आपली दुचाकी पेटवून दिली आहे. या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. जालना जिल्ह्यातील भोकरदन येथे सकल मराठा समाजाच्या वतीने आज आंदोलन करण्यात आले. यावेळी रस्ता रोको करत टायर पेटवून देण्यात आले. दरम्यान, याचवेळी स्वराज्य संघटनेचा जिल्हाध्यक्ष विकास जाधव याने स्वत:ची दुचाकी पेटवून दिल्याची घटना समोर आली आहे. पेट्रोल टाकत त्याने आपली दुचाकी रस्त्याच्या मधोमध पेटवून दिली.

## फडणवीसांना भाजपमधून काढा, अन्यथा ते मराठ्यांना गोळ्या घालून मारतील: मनोज जरांगे



**मुंबई :** राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्ज बाबत विधान केले होते. यावेळी त्यांनी पोलिसांची बाजू घेत नक्की मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज का करण्यात आला? याची माहिती दिली. यावरून त्यांच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. यावर बोलतान मनोज जरांगे यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी ते म्हणाले की, फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी कित्येक जण करत आहेत. मात्र भाजपने त्यांना पक्षात ठेवूच नये, त्यांनी केलेले विधान हे मराठा विरोधी आहे.आम्ही प्रामाणिक लोक आहोत. आम्हाला फडणवीस एक चांगली व्यक्ती वाटायची. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर देवच वाटायचे. मात्र फडणवीस यांच्या मनात मराठा द्वेष असल्याचे आम्हाला पाहायला मिळत आहे. त्यांनी केलेल्या विधानामुळे भाजपमध्येच कित्येक मराठा चेहरे नाराज आहेत. मी त्यांची नावे घेणार नाही. मात्र भाजपमधील मराठा चेहरे नाराज आहेत. ही वस्तुस्थिती आहे. असे यावेळी ते म्हणाले.

## जालना जिल्ह्याचे एसपी तुषार दोषी सक्तीच्या रजेवर



**जालना :** जालना जिल्ह्यात झालेल्या घटनेनंतर आता सरकारने कारवाईला सुरुवात केली आहे. गृहमंत्रालयाकडून जालना जिल्ह्याचे एसपी यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. जालना येथील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी उपोषणास बसलेल्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. त्यांमुळे या घटनेच्या विरोधात राज्यभरात संतापाचे वातावरण पाहायला मिळत होते. तर आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर लाठी मार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. दरम्यान या सर्व प्रकरणाची आता गृह विभागाने गंभीर दखल घेतली असून, जालना पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांच्यावर पहिली कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक दोषी यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. त्यामुळे जालना प्रकरणात ही पाहिली कारवाई समजली जात आहे. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या जालन्यातील 200 ते 250 आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## काँग्रेस नेत्या सोनिया गांधी रुग्णालयात दाखल



**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांना सौम्य तापाची लक्षणे आढळल्याने त्यांना दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोनिया गांधी या सध्या डॉक्टरांच्या निरिक्षणाखाली असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. सोनिया गांधी यांना मार्चमध्येही रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, एका दिवसानंतर जारी करण्यात आलेल्या मेडिकल बुलेटिनमध्ये त्यांची प्रकृती स्थिर असून ते पूर्णपणे निरोगी असल्याचे सांगण्यात आले. सोनिया गांधी सध्या राजकारणात सक्रिय दिसत आहेत. नुकत्याच मुंबईत झालेल्या विरोधी पक्षनेत्यांच्या बैठकीत सोनिया गांधीही सहभागी झाल्या होत्या. यापूर्वी बंगळुरू येथे झालेल्या विरोधी एकतेच्या बैठकीतही त्या सहभागी झाल्या होत्या.

## संसदेच्या विशेष अधिवेशना ना शून्य तास, ना प्रश्नोत्तरांचा तास



**नवी दिल्ली :** संसदेच्या विशेष अधिवेशनाबाबत अजूनही सस्पेंस कायम आहे. यादरम्यान काय होणार याबाबत केवळ अंदाज बांधला जात आहे. या चर्चांमध्ये रोहिणी आयोगाच्या अहवालापासून ते 'वन नेशन-वन इलेक्शन' आणि सभागृह नव्या संसदेकडे हलवण्यापर्यंतची चर्चा आहे. दरम्यान, या विशेष अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास किंवा शून्य तास नसल्याची बाबही समोर आली आहे. या दोघांशिवाय दोन्ही सभागृहांचे सत्र सुरू राहणार आहे. लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांनी शनिवारी सांगितले की, संसदेच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन 18 ते 22 सप्टेंबर दरम्यान प्रश्नोत्तराचा तास किंवा खाजगी सदस्यांच्या कामकाजाशिवाय होणार आहे. सचिवालयाने सांगितले की अधिवेशनात पाच बैठका असतील आणि सदस्यांना तात्पुरत्या कॅलेंडरबद्दल स्वतंत्रपणे माहिती दिली जाईल. सतराव्या लोकसभेचे 13 वे अधिवेशन सोमवार, 18 सप्टेंबर 2023 रोजी सुरू होणार असल्याची माहिती सदस्यांना देण्यात आली आहे, असे लोकसभा सचिवालयाने शनिवारी म्हटले आहे.

## तेलंगणात श्रीरामपूर घटनेची पुनरावृत्ती

### शेळ्या चोरल्याच्या संशयावरून दलित व्यक्तीला उलटे टांगले


**तेलंगणात :** शेळ्या चोरल्याच्या संशयावरून अहमदनगरच्या श्रीरामपूर तालुक्यातील हरेगावात तीन दलितांना उलटे टांगण्यात आलं होतं. आता असाच प्रकार तेलंगणातील मंचिरियाल जिल्ह्यात घडला आहे. शेळ्या चोरल्याच्या संशयावरून येथे एका दलित व्यक्तीला आणि त्याच्या मित्राला शेडमध्ये उलटे टांगून त्यांचा अमानुष छळ करण्यात आला आहे. कोमुराजुला रामुलू यांच्या शेळ्या बेपत्ता झाल्या होत्या. शेळी चोरल्याच्या संशयावरून एक



गुराखी तेजा आणि त्याचा दलित मित्र चिलुमुला किरण यांना शेडमध्ये बोलावण्यात आले. रामुलू, त्याची पत्नी आणि मुलाने त्या तिघांना उलटे लटकवले आणि बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे तर उलटे टांगून त्यांना धुरी देण्यात आली. हा प्रकार समोर येताच संताप व्यक्त केला जात आहे.

याप्रकरणी किरणच्या पत्नीने पोलिसांत धाव घेतली. तिने केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी एससी/एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. बेल्लमपल्ली एसीपी सदैया आणि एसएसआय चंद्रकुमार यांनी शनिवारी घटनास्थळाची पाहणी केली. तर, याप्रकरणी कोमुराजुला रामुलू, त्यांची पत्नी स्वरूपा आणि मुलगा श्रीनिवास या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

## भारत हिंदूंचा देश, तुम्ही पाकिस्तानात जा ... : कर्नाटकातील शिक्षिका



**कर्नाटक :** कर्नाटकातील शिवमोग्गा येथील टीपू नगर सरकारी शाळेत कन्नड भाषा शिकवणाऱ्या मंजुळा देवी या शिक्षिकेने इयत्ता पाचवीतील दोन विद्यार्थ्यांवर जातीवाचक टिप्पणी केली. उत्तर प्रदेश, दिल्लीनंतर आता कर्नाटकातील मुस्लीम समाजातील दोन विद्यार्थ्यांवर त्यांच्या शिक्षिकेने जातीवाचक टिप्पणी केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. दरम्यान, या शिक्षिकेची बदली करण्यात आली असल्याची माहितीही समोर आली आहे.

कर्नाटकातील शिवमोग्गा येथील टीपू नगर सरकारी शाळेत कन्नड भाषा शिकवणाऱ्या मंजुळा देवी या शिक्षिकेने इयत्ता पाचवीतील दोन विद्यार्थ्यांवर जातीवाचक टिप्पणी केली. हे विद्यार्थी वर्गात भांडत होते. यावरून मंजुळा देवी या वैतागल्या. त्यामुळे, 'तुम्ही पाकिस्तानात जा. हा हिंदूंचा देश आहे', असे त्या म्हणाल्या.

दरम्यान, शाळा सुटल्यानंतर विद्यार्थी घरी परतले. त्यांनी ही घटना त्यांच्या पालकांना सांगितली. याबाबत त्यांनी स्थानिक नेत्यांना कळवले. विद्यार्थ्यांच्या तक्रीरावरून शिवमोग्गा जेडीएस नेते ए नजुल्ला यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

## बालासोर: रेल्वेच्या तीन कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा ठपका



**नवी दिल्ली :** बालासोर येथे 2 जून रोजी झालेल्या रेल्वे अपघातप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागा(सीबीआय)ने शनिवारी रेल्वेच्या तीन कर्मचाऱ्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. हे कर्मचारी सध्या अटकेत असून त्यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवध आणि पुरावे नष्ट केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रकरणी अटक झालेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांत वरिष्ठ विभाग अभियंता (सिग्नल) अरुणकुमार महंता. विभाग अभियंता अमिर खांद आणि तंत्रज्ञ पप्पू कुमार यांचा समावेश आहे. त्या सर्वांना 7 जुलै रोजी अटक करण्यात आले होते. या दुर्घटनेत तीन रेल्वेगाड्यांचा समावेश होता. त्यात 296 प्रवाशांचा मृत्यू ओढवला होता, तर 1200 जण जखमी झाले होते. बहनगा बाजार स्थानकाच्या प्रवेशद्वार क्रमांक 94 नजीकच्या लेव्हल क्रॉसिंगच्या ठिकाणी आरोपी महंता यांनी केलेले दुरुस्तीकाम हे त्यांनी लेव्हल क्रॉसिंग प्रवेशद्वार क्रमांक 79 ची सर्किट आकृती वापरून केले होते, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## सर्व जिल्ह्यांमध्ये काँग्रेसकडून 'भारत जोडो यात्रे'चे आयोजन

**नवी दिल्ली :** काँग्रेसने अलिकडेच खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'भारत जोडो यात्रे'चे आयोजन केले होते. भारताचे दक्षिणेकडील टोक कन्याकुमारी ते जम्मू-काश्मीर अशी ही पदयात्रा काढली होती. देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'भारत जोडो यात्रा' काढणार असल्याची घोषणा केली. राहुल गांधी यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये पदयात्रेचा पहिला टप्पा सुरू केला होता. त्याचा समारोप काश्मीरमध्ये झाला. दरम्यान, राहुल गांधींनी सुमारे 130 दिवसांहून अधिक काळ पायी प्रवास केला. ही पदयात्रा 12 राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांतून गेली होती.

काँग्रेसचे जनरल सेक्रटरी के.सी. वेणुगोपाल यांनी 'भारत जोडो यात्रे'च्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 7 सप्टेंबर 2023 रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये संध्याकाळी 5 ते 6 या वेळेत 'भारत जोडो यात्रा'




काढावी, अशा सूचना दिल्या आहेत. याबाबतचे परिपत्रकही जारी केले आहे. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेचा दुसरा टप्पा गुजरातपासून सुरू होऊन ईशान्येकडील राज्य मेघालयापर्यंत जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली होती. दुसरीकडे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनीही याआधी नोव्हेंबरपूर्वी गुजरातमधील पोरबंदर ते अरुणाचल प्रदेशातील पासीघाटपर्यंत 'भारत जोडो यात्रा' काढली जाणार असल्याची शक्यता व्यक्त केली होती.



## चांद्रयान 3 'स्लीप मोड'वर

**श्रीहरीकोटा :** इस्त्रोने चांद्रयान 3 या मोहिमेबाबतची मोठी अपडेट दिली आहे. इस्त्रोने रविवारी ट्वीट करत रोव्हरने दिलेले काम पूर्ण केल्याचे सांगितले. इस्त्रोने चांद्रयान-3 मोहिमेची माहिती देताना म्हटले, 'रोव्हरने त्याला दिलेले काम पूर्ण केले आहे. आता त्याला सुरक्षितपणे 'पार्क' करण्यात आले आहे आणि त्याचा 'स्लीप मोड' सक्रीय करण्यात आला आहे. एपीएक्सएस आणि एलआयबीएस पेलोड्सही बंद करण्यात आले आहेत. या पेलोड्समधील डेटा लँडरमार्फत पृथ्वीवर पाठवण्यात आला आहे.'

## सनातन धर्म हा मलेरिया-डेंग्यूसारखा, याला...: उदयनिधी स्टॅलिन



**तमिळनाडू :** तमिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांचा मुलगा उदयनिधी स्टॅलिन यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे नवीन वाद पेटला आहे. सोशल मीडियावर भाजपसहित अनेक नेत्यांनी या विधानावर तिव्र नाराजी व्यक्त केला आहे. उदयनिधी यांनी त्यांच्या वक्तव्यात सनातन धर्माची तुलना डेंग्यू आणि मलेरियाशी केल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

उदयनिधी म्हणाले की, सनातन धर्माचा फक्त विरोधत नवे तर याला नष्ट केले पाहिजे, उदयनिधी हे शनिवारी सनात्न उन्मुलन सम्मेलनात बोलत होते.

> "सनातन धर्म सामाजिक न्याय आणि समानतेच्या विरोधात आहे, काही गोष्टींचा विरोध केला जाऊ शकत नाही, त्यांना नष्ट केले पाहीजे. आपण डेंग्यू, मच्छर, मलेरिया किंवा करोनाचा विरोध करू शकत नाही. या गोष्टी संपवल्या पाह्जित. अशाच पद्धतीने सनातन देखील नष्ट केलं पाह्जि.
>
> - **उदयनिधी स्टॅलिन**

तमिळनाडुमधील सत्ताधारी पक्ष डीएमके सरकारनध्ये युवा आणि कल्याण तसेस क्रीडा मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांच्या या वक्तव्यावरून गोंधळ उडाला आहे. भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी त्यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे: त्यांनी उदयनिधी स्टॅलिन यांनी देशातील 80 टक्के लोकसंख्येच्या नरसंहाराचे अवाहन केल्याचा आरोप केला आहे. अमित मालवीय म्हणाले की, तमिळनाडुच्या मुख्यमंत्र्याचे पुत्र आणि डीएमके सरकारचे मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्माची मलेरिया आणि डेंग्यू सोबत तुलना केली. त्याचे म्हणणे आगहे की याचा फक्त विरोधच नव्हे तर हे नष्ट केले पाहिजे. डीएमके विरोधकांच्या आघाडीतील एक प्रमुख पक्ष आहे आणि काँग्रेसचा दिर्घ काळापासून सहकारी पक्ष आहे. मुंबईतील बैठकीत याबाबत देखील एकमत झाले होते का?

## भारतीय वंशाचे थर्मन षण्मुगरत्नम सिंगापूरचे नवे अध्यक्ष



**नवी दिल्ली :** सिंगापूर मूळ भारतीय वंशाचे व सिंगापूरमध्ये जन्मलेले अर्थतज्ज्ञ थर्मन षण्मुगरत्नम यांनी सिंगापूरच्या अध्यक्षीय निवडणुकीत शुक्रवारी प्रचंड बहुमताने विजय मिळवला. 2011 सालानंतर प्रथमच झालेल्या या निवडणुकीत त्यांनी एकूण मतदानापैकी 70 टक्के मते मिळवली. माजी वरिष्ठ मंत्री असलेले षण्मुगरत्नम यांनी 20 लाख 48 हजार मतदानापैकी 70.4 टक्के इतकी भरघोस मते मिळवली. त्यांचे चिनी वंशाचे प्रतिस्पर्धी नस कोक साँग आणि तान किन लिआन यांना अनुक्रमे 15.72 टक्के व 13.88 टक्के मते मिळाल्याचे निवडणूक विभागाने सांगितले. निवडणूक अधिकारी तांग मेंग दुई यांनी मध्यरात्रीनंतर या निकालाची घोषणा केल्यानंतर, थर्मन हे सिंगापूरचे तिसरे भारतीय वंशाचे अध्यक्ष बनले. 2011 ते 2019 या काळात देशाचे उपपंतप्रधान राहिलेले थर्मन यांच्या अध्यक्षीय निवडणुकीतील विजयाबद्दल पंतप्रधान ली सेन लूंग यांनी त्यांचे अभिनंदन केले. पंतप्रधानांच्या पीपल्स ॲक्शन पार्टीने (पीएपी) या निवडणुकीत थर्मन यांना पाठिंबा दिला होता. 'सिंगापूरवासीयांनी मला जे भरघोस समर्थन दिले आहे, त्यामुळे मी खरोखर विनम्र झालो आहे', असे थर्मन म्हणाले. षण्मुगरत्नम यांच्या सिंगापूरच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शनिवारी त्यांचे अभिनंदन केले.

## अमेरिकन शास्त्रज्ञांचा भारतीय शेतकऱ्यांना गंभीर इशारा

### भूजल पातळी खालावेल

**नवी दिल्ली :** भारतात शेतकऱ्यांनी सध्याच्या वेगाने भूजलाचा उपसा करणे सुरू ठेवले, तर 2080पर्यंत देशातील भूजल साठा खालावण्याचा वेग सध्याच्या तिपटीवर जाईल, त्यामुळे देशाची अन्नसुरक्षा तसेच जलसुरक्षा यांना गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा एका ताज्या संशोधनात देण्यात आला आहे.

अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे. जागतिक तापमानवाढीमुळे भारतातील शेतकऱ्यांनी जलसिंचनासाठी भूजलाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढवला आहे. परिणामी, जलसाठा घटल्याने देशाच्या 1.4 अब्ज लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकसंख्येची उपजीविका धोक्यात येईल आणि त्याचे जागतिक पातळीवरही भीषण परिणाम होतील, असा इशारा 'सायन्स ॲडव्हान्सेस' या विज्ञानपत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या संशोधनात देण्यात आला आहे.



संशोधकांनी पूर्वीची भूजलपातळी, हवामान आणि पिकांवरील ताण याआधारे भूजल उपशातील बदलांची नोंद घेतली. त्याआधारे देशभरात भविष्यात भूजलाचा उपसा किती होईल, याचा अंदाज मांडण्यात आला. त्यापुढे जाऊन, वाढत्या तापमानामुळे पाण्याची गरज वाढत असल्यावरही त्यांनी संशोधन केले. त्यावरून हे निष्कर्ष काढण्यात आले. वाढते तापमान आणि कमी होत असलेले हिवाळ्यातील पर्जन्यमान यांच्या परिणामी भूजल उपशाचा वेग अधिक आहे. त्या तुलनेत पावसाळ्यातील वाढीव पर्जन्यमानामुळे होणारे पुनर्भरण कमी आहे, असे शास्त्रज्ञांना या संशोधनाअंती आढळले.

भारतातील भूजलपातळी आधीच खालावत आहे. त्यातच तापमानवाढीमुळे भर पडत आहे. त्यामुळे भूजलाच्या संवर्धनासाठी धोरणांची आणि हस्तक्षेपाची गरज आहे. अन्यथा हवामान बदलामुळे देशाची अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षा धोक्यात येईल, असा इशारा या संशोधनाचे मुख्य लेखक निशान भट्टाराय यांनी दिला आहे.

*भारत हा भूजलाचा सर्वाधिक वापर करणारा देश आहे. प्रादेशिक तसेच जागतिक पातळीवर अन्नपुरवठा करण्यासाठी भारत महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे भूजल उपशाबाबत मांडण्यात आलेले निष्कर्ष भारतासाठी गंभीर आहेत.*

**- मेहा जैन, सहायक प्राध्यापक, स्कूल फॉर एन्व्हायर्न्मेंट अँड सस्टेनेबिलिटी, मिशिगन विद्यापीठ.**

## मोफत कायदेशीर सेवा

**विमा क्लेम ( एलआयसी, जीआयसी )**
**जमीन, पेमेंट, कुटुंब, अपघात,**
**बँकेची थकबाकी, कोणत्याही**

प्रत्येक वक्तीला कुठे ना कुठे समाजात वावरत असताना अडचणी ला समोर जावे लागते. बरेचदा योग्य सल्ला न मिळाल्यामुळे अनेकांचे नुकसान झालेले आपण पाहतो. फोन वर माहिती मिळवून त्याचा उपयोग आपणास होऊ शकतो. कुठलाही संकोच न ठेवता आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ADVOCATE

वेळ सायं. 6 ते 9

अॅड. सिद्धार्थ कांबळे M.V.Sc, M.B.A ,L.L.M.

संपर्क : 9422539451, 9359381185 (अजनी पोलिस स्टेशनजवळ, बहुजन सौरभ कार्यालय, नागपूर-27)

“ आपल्या नियतीचे मालक बना
पण परिस्थितीचे गुलाम बनू नका. ”



संपादकीय

# ‘इंडिया’ या आघाडीचा जन्म!

गेली दहा वर्षे विविध निवडणुकांमधुन भाजपकडून भरपूर पिछेहाट सहन करावी लागल्याने भाजपग्रस्त विरोधक अखेर एकत्र आले आणि त्यातून ‘इंडिया’ या आघाडीचा जन्म झाला. कोणत्याही बलदंडाकडून होते ती आपल्या प्रतिस्पर्ध्याला कमी लेखण्याची चूक सत्ताधारी भाजपने आधीपासुन केली, पण हे प्रकरण वाटते तितके दुर्लक्षित करण्यासारखे नाही, हे लक्षात आल्यावर या ‘इंडिया’कडे भाजप गांभीर्याने पाहू लागला. त्याचमुळे मुंबईत 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबराला ‘इंडिया’च्या या बैठकीकडे भाजप लक्ष ठेवून होताच. हा झाला पक्षीय राजकारणाचा विचार. त्यापलिकडे जात मतदारांस आकर्षित करेल असे काही या बैठकीतून निघते काय किंवा त्या दिशेने विरोधकांची वाटचाल कायम राहील काय? हा प्रश्न राजकीय हितापेक्षा अधिक महत्त्वाचा ठरतो.

लोकशाहीला भक्कम करण्यासाठी सशक्त विरोधी पक्ष हवा, हे सत्य आहे. सशक्त विरोधी पक्ष हा सुदृढ सत्ताधाऱ्यांना मदमस्त होऊ देत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सध्या सत्ताधारी असलेला भाजप. संपूर्ण देश असो वा महाराष्ट्रासारखे एखादे राज्य असो. भाजपने विरोधी पक्षाची भूमिका मन लावून केली. ते पाहूनच विरोधी पक्षांत बराच काळ काढलेल्या भाजपला मतदारांनी सत्तेची संधी दिली, पण ती संधी मिळाल्या नंतर मात्र जे कार्य आपण नेटकेपणाने केले ते अन्य कोणास करताच येऊ नये, अशा प्रकारचे राजकारण भाजपने केले. आपले राजकीय विरोधक आणि टीकाकार यांच्याबाबत भाजपची वर्तणूक सहिष्णुतेच्या अभावाची निदर्शक होती, असे म्हणता येणार नाही. त्याचा परिणाम असा की एके काळी भाजपपेक्षाही अधिक बलशाली काँग्रेसविरोधात विरोधकांची एकी होण्यासाठी पाच दशके वाट पहावी लागली, पण भाजपला त्यातही नव्या भाजपला...मात्र यासाठी दहा वर्षे पुरेशी ठरली. विरोधकांना एकमेकांजवळ आणण्यासाठी काँग्रेसला आणीबाणी लावावी लागली. भाजपला त्याची गरजच लागली नाही. असे काहीही न करता आपले विरोधक एकत्र येतील असे राजकारण भाजपने केले.

त्यासाठी विरोधकांच्या आघाडीस यापुढील टप्प्यात काही एक कार्यक्रम मतदारांसमोर मांडावा लागेल आणि त्याच्या अंमलबजावणीबाबतचे गांभीर्य आपल्या सामूहिक वर्तनातून सिद्ध करून दाखवावे लागेल. याचे कारण असे की केवळ अमुक एखादी व्यक्ती नको ही भावना राजकीय पक्षांची असू शकेल. पण कोट्यवधी मतदारांची ती भावना आहे काय हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे. तो प्रश्न पडतो याचे कारण राजकीय विरोधकांना एखाद्या व्यक्तीचा जितका उपद्रव वाटत असेल तितक्या प्रमाणात त्या उपद्रवाची तीव्रता नागरिकांनाही असली पाहिजे. नागरिकांच्या भावनेस स्पर्श करू शकेल असा काही कार्यक्रम विरोधकांच्या ‘इंडिया’ला द्यावा लागेल. यात भावनेचा उल्लेख केला याचे कारण भारतीय निवडणुकांमध्ये बुद्धीपेक्षा भावनाच निर्णायक ठरते हे आतापर्यंत अनेकदा सिद्ध झालेले आहे. भावनेच्याभरात केलेल्या जनमताचे समर्थन नंतर त्या त्या पक्षांचे खंदे समर्थक वा भक्त बुद्धीच्या आधारे करू पाहतात. ते खपून जातेही मात्र त्या बुरख्याआड भावनाकल्लोळ दडलेला असतो. हे सत्य लक्षात घेवून ‘इंडिया’ला आधी समस्त मतदारांच्या भावनांना स्पर्श करेल असा काही कार्यक्रम द्यावा लागेल. सत्ताधारी भाजपने या खात्यावर पुरेशी बेगमी करून ठेवलेली आहे. त्यासाठी राम मंदिर ते मुसलमानांबाबत चतुर द्वेषाच्या पेरणीतून हिंदूत्वाचे एकगठ्ठीकरण असे अनेक पर्याय सत्ताधाऱ्यांसमोर आहेत. म्हणून विरोधकांसमोरचे आव्हान अधिक खडतर आहे. वाढती बेरोजगारी, कमालीची दरवाढ, काही उद्योगपतींचे नशीब फळफळणे इत्यादी मुद्दे विरोधकांना अशा पद्धतीने मांडावे लागतील की ज्यामुळे त्याचा संबंध आपल्या जगण्यातील हलाखीशी आहे असे सामान्यांना वाटेल. या संदर्भात 2012 पासून भाजपने तत्कालीन सरकारातील कथित आर्थिक घोटाळ्यांचे नाते नागरिकांना तेव्हा भेडसावणाऱ्या महागाईशी कसे जोडले याचा अभ्यास ‘इंडिया’च्या नेत्यांनी करावे. वास्तविक भाजपला यातील भ्रष्टाचाऱ्यांचे काही देणे घेणे होते ना महागाईशी काही देणे घेणे आहे. म्हणजे कथित दूरसंचार घोटाळ्यातील आरोपी आणि त्यांचा द्रमुक पक्ष यांनी आपल्याशी हातमिळवणी करावी यासाठी भाजपच्याच कोणी चेन्नईत नतमस्तक झाले हे सर्व जाणतात. तसेच त्यावेळी 400 रुपयांवर गेलेल्या गॅस सिलिंडरच्या सध्या 1400 रुपयांच्या किमतीतून 200 रु. कमी करून औदार्याचा आव कसा आणता येतो हेही सर्व पाहतात. तथापि या सगळ्या विषयांचे निवडणुकीच्या मुद्द्यांत रूपांतर करता येते किंवा काय यावर राजकीय पक्षांचे यशापयश ठरत असते. यासाठी आवश्यक कौशल्य आपल्याकडे आहे हे या ‘इंडिया’च्या घटक पक्षांना सिद्ध करावे लागेल. त्याच बरोबरीने निवडणूक रोखे, जम्मू-काश्मीरचे 370 कलम रद्द करण्याचा निर्णय इत्यादी विषयांवर आपली भूमिका काय हे या लोकांना स्पष्ट करावे लागेल. विरोधी पक्षात असताना भाजप केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या यंत्रणांच्या स्वायत्ततेबाबत सातत्याने कंठशोष करीत असे. तथापि सत्ता मिळाल्यानंतर भाजपचे मत बदलले. उलट सीबीआयच्या जोडीने भाजपने सक्तवसुली संचालनालयासारखे नवेच अस्त्र विकसित केले. या दोन अस्त्रांच्या बेछूट माऱ्यासमोर आज विरोधकांची मोठीच धूळधाण झालेली दिसते. या सरकारी यंत्रणाचे शस्त्रीकरण हा लोकशाहीसमोरील सर्वात मोठा धोका आहे असे विरोधक म्हणतात परंतु या यंत्रणांस वेसण घालण्यासाठी आपण काय करू इच्छितो हे विरोधकांना सांगावे लागेल. शेती, उद्योग अशा अनेक आघाड्यांवर आज देश म्हणून आपला संघर्ष सुरू आहे. त्याबाबत आपली भूमिका ‘इंडिया’ने स्पष्ट करणे गरजेचे आहे. याचे कारण आज बेरोजगारी जर देशामोरील सर्वात मोठी समस्या असेल तर तिचे उत्तर सक्षम उद्योग आणि फलदायी शेतीतूनच मिळणार आहे. त्यासाठी आपल्या स्वतंत्र पर्यायांची मांडणी विरोधकांना करावी लागेल. काँग्रेस आणि डाव्यांच्या प्रेमापोटी काही उत्साही स्वयंसेवी संस्था विरोधकांना साथ देताना दिसतात. या अशा माध्यमांतून चर्चा जरूर होते. भारतीय मतदारांच्या भावनात्मक मानसिकतेशी याचा संबंध आहे. त्याचमुळे सुरुवातीस महात्मा गांधी, आणीबाणीनंतरच्या काळात जयप्रकाश नारायण आणि 2012 नंतर यांची बोन्साय आवृत्ती असलेले अण्णा हजारे यांची आंदोलने महत्त्वाची ठरली. यातील महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांच्या निरलसतेविषयी काही कोणाचे दुमत असणार नाही. अण्णांच्याबाबतीत मात्र सगळ्यांचीच तशी बोंब आहे. पण रा. स्व. संघाच्या दुलईमुळे ते उघडे पडले नाहीत. त्यावेळी मनमोहनसिंग सरकारविरोधात नाराजीचे एकत्रीकरण करण्यासाठी अण्णांचा चांगलाच उपयोग झाला. तो कार्यभाग साधला गेल्यावर आणि आता कोणी विचारणारे नसल्याने अण्णा हजारे आपल्या यादवबाबा मठीत नजरकैदेत असल्यासारखे पडून असतात. ‘तुमचे ‘जेपी’ कोण’ असा प्रश्न या ‘इंडिया’च्या धुरीणांना अलिकडे वारंवार विचारला जातो.

## बहुजन मानस





नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
9970873560

# द्रविड कझघम व जातव्यवस्था विरोध

**तामीळनाडू किंवा आधीच्या मद्रास प्रांतात पेरियर रामास्वामींनी जी सामाजिक, सांस्कृतिक, नाशिक व देवदैवविरोध आंदोलने केलीत त्याचा परिणाम जाणि प्रभाव तिथल्या जनजीवनावर आजही दिसून येतो.**

आम्ही बहुजन संघर्ष परिवारातील सहा सदस्य तेथे के. वीरमणी, द्रविड कझगम यांच्या निमंत्रणावरुन सत्यशोधक समाजाच्या सव्वाशे वर्षांच्या महोत्सवात सामील होण्यासाठी एप्रिल 1999मध्ये गेलो होतो. त्यावेळी आम्हाला द्रविड कथमच्या प्रभावाची जी महती कळली ती इथे महाराष्ट्रात ज्या फुल्यांना पेरियर यांनी प्रेरणास्थान मानले होते तिथे हा - परिणाम, प्रभाव दिसत नाही. पेरियरांनी सर्वव्यापी ब्राह्मणीवर्चस्वाविरुद्ध ज्या मोहिमा उघडल्या व चळवळी केल्यात त्यांची छाप अजूनही दिसत आहे.

दुसरे म्हणजे पेरियर यांनी 1939 मध्ये जस्टीस पार्टीचे नेतृत्व केले होते, तिचे परिवर्तित रूप आणि नाव म्हणजे द्रविड कझघम होय. द्रविड नाव धारण करण्यापासून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख पकमदजपजल निर्माण केली. आर्य विरुद्ध द्रविड असे सरळ सरळ वंशीय भाग केले आणि आम्ही वेगळे, तुम्ही वेगळे, तुम्ही वर्ण-जात व्यवस्थावादी तर आम्ही जात व्यवस्था विरोधी विशमता विरोधी अशी स्वतंत्र नी न्यायवादी, समतावादी भूमिका घेतली.

दुसरे म्हणजे, पेरियर यांनी अगदी कटाक्षाने निवडणुकीच्या राजकारणापासून स्वतःला आणि द्रविड कझघमला दूर ठेवले. त्यांनी हे सतत बिंबवण्याचा प्रयत्न केला की राजकारणातून सामाजिक व्यवस्थेत बदल होत नाही, म्हणून राजकारण म्हणजे एक प्रकारे समाजव्यवस्था, ब्राह्मणवर्चस्व टिकवणारी बाब होय अशी त्यांची मांडणी होती. परंतु त्यांचे सहकारी शिक्य त्यांनीच त्यांच्याशी मतभेद उकरुन काढून डी. के. द्रविड कझघम या सामाजिक सांस्कृतिक संघटनेपासून अलग होऊन डी.एम.के. (द्रविड मुन्नेत्र कझघम) हा राजकीय पक्ष अण्णादुराई यांनी स्थापन केला. अर्थात, त्या राजकीय पक्षावर देखील पेरियर यांच्या विचार, संस्कारांचा प्रचंड प्रभाव होता आणि म्हणून अण्णादुराई यांनी तामिळनाडूच्या राजकारणाला आगळेवेगळे वळण दिले. आज त्याच नावाचे काही राजकीय पक्ष आहेत, अण्णा डी.एम.के., एम.डी.एम.के. व इतर, पण सर्व राजकीय पक्षांवर डी.के.च्या विचारांचा आजही प्रभाव जाणवतो व म्हणून तामिलनाडूत आजही काँग्रेस किंवा भाजप या ब्राह्मणी पक्षांची डाळ शिजत नाही.

खरे म्हणजे खंत याची वाटते की ज्या महाराष्ट्रातून हे विचार तिथे गेले, त्या महाराष्ट्रात आज तामिळनाडू प्रमाणे ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध प्रखर भूमिका व प्रभाव दिसायला हवा होता. इथे फुले-शाहू-आंबेडकर नाव घेणारे राजकारणी आहेत, पण त्यांची ती धुरा गैरराजकीय संघटनेत दिसत नाही, किंवा द्रविड कझघमसारखी वेगळी स्वतंत्र वाट असणारी, सामाजिक, सांस्कृतिक संघटना येथे जगली नाही, वाढली नाही. सत्यशोधक समाज चालवणारे त्या वकुबाचे पुढ निघाले नाहीत. जे आज ते नाव घेतात ते राजकारण्यांना शरण जाणारे व व्यक्तिस्वार्थ जपणारे (विचार सोडून) आहेत. त्यामुळे महाराष्ट्र वामनी घशातच गेला नाही, तर इथूनच फुले-शाहू-आंबेडकरांची तत्वे, विचार, संघटन नेस्तनाबूत करणार्या संघटनेचा- रा.स्व. संघाचा जन्म झाला. जे संघटन हिंदुराष्ट्र नावाखाली देशभर ब्राह्मण वर्चस्व प्रस्थापित करते झाले. सत्यशोधक समाजाबरोबर महाराष्ट्र प्रखरपणे उभा राहला असता तर इथे टिळक- सावरकर-गोळवलकरांची डाळ शिजली नसती. पण....?



**जात निर्मूलनाचा विचार पुनर्जिवित व्हावा:**

द्रविड कझघमची 23 फेब्रु. 19, मध्ये तंजावर येथे जी परिशद झाली. तिथले काही ठराव या ठिकाणी देत आहोत आणि अशी अपेक्षा करत आहोत की इथला जात निर्मूलनाचा विचार पुनर्जिवित व्हावा कारण संघाचा विजय जात व्यवस्था जगण्यावर आहे.. ती नश्ट करणे म्हणजे मानवता-समता साकारणे होय.

**तंजावर येथील द्रविड कझघमच्या राज्यस्तरीय अधिवेशनात पारित झालेले काही ठराव:**

**1) जातीप्रथा आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन:-** अस्पृश्यता निर्मूलन करणे हा भारतीय घटनेच्या 17 व्या कलमाचा प्रधान उद्देश आहे. जातीव्यवस्थेमुळेच अस्पृश्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जातीविरुद्ध लढा दिल्याशिवाय अस्पृश्यता नष्ट होणार नाही. नुसते अस्पृश्यते विरुद्ध लढणे म्हणजे एखाद्या व्यक्तीशी न लढता, त्या व्यक्तीच्या सावलीशी लढण्यासारखेच आहे. घटनेच्या 17 व्या कलमामध्ये अस्पृश्यता नश्ट झाली पाहिजे, या शब्दांच्या जागी जातव्यवस्था नष्ट झाली पाहिजे असा शब्दप्रयोग करायला हवा. या परिशदेचा असा आग्रह आहे की, या साठी घटनेमध्ये बदल (अमेन्डमेंट) करावा. 8 व 9डिसे. 1973 मध्ये पेरियार इ. व्ही. रामास्वामींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिशदेमध्ये तमिळींना कमी लेखले जाण्याविरुद्ध जो ठराव पारीत झाला होता तो आता पुनः पारीत

**2) आंतरजातीय विवाह करणार्यांच्या आपत्यांना आरक्षण मिळायलाच हवे.**

1. ही परिशद राज्यसरकारे आणि केन्द्र सरकार यांना असे लक्षात आणून देते की समाजातील जातीयतेचा आजार नस्ट करायचा असेल तर आरक्षणाची गुटी शिक्षण, नोकर्या, बढती यात उपयोगात आणायलाच हवी. आरक्षणाचा उपयोग बाकी कोणत्याही कारणासाठी, उद्देशासाठी होता कामा नये. युटीध-

2. एखाद्याला जेव्हा आरक्षणासाठी जात प्रमाणपत्र दिले जाते तेव्हा त्यात फक्त एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., असाच फक्त उल्लेख हवा. त्यात कोणत्याही जातीचा उल्लेख असू नये..

3. आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या अपत्यांना जेव्हा आरक्षण दिले जाईल, तेव्हा त्यांच्या प्रमाणपत्रावर ‘जातविरहीत (ब्ेंजमसमे)‘ असा उल्लेख असावा, या निकशावर आरक्षण घेणार्या व्यक्तींचे प्रमाण जसजसे वाढत जाईल तस तसे जातीच्या आधारावर आरक्षण घेणार्यांचे प्रमाण कमी कमी होत जाईल. ही परिशद अशाप्रकारे आरक्षण देता यावे म्हणून घटनेत जो बदल करावा लागेल तो केन्द्र सरकारने करावा यासाठी आग्रही आहे.

4. अनुसूचित जातींच्या लोकांना राहण्यासाठी सोय करताना वेगळ्या वसाहती वसवू नयेत, असे झाल्यास ते लोक समाजाच्या इतर घटकांपासून दूर जातील.

ही परिशद केन्द्र सरकार आणि राज्यसरकार यांना असे आग्रहाने सांगते की त्यांनी घरांच्या वसाहती अशा प्रकारे उभाराव्या की सगळ्या जातींचे लोक एकत्र राहतील.

5. 1978 साली सरकारने असा कायदा पास केला होता की, अशा वसाहती निर्माण झाल्यावर त्यांना किंवा त्यातील रस्त्यांना कोणत्याही जातींच्या व व्यक्तींच्या नावाने ओळखले जाऊ नये. ही परिशद तामिलनाडू सरकारला अशी विनंती करते की या नियमाला ताबडतोब पूर्णपणे लागू करावे.

6. ज्या प्रमाणे देवळातील मूर्ती चोरीला गेलेली प्रकरणे हाताळण्यासाठी स्वतंत्र पोलीस सेलची निर्मिती करण्यात आली आहे, त्याप्रमाणे धार्मिक कारणाने किंवा जातीच्या कारणाने निर्माण झालेली प्रकरणे हाताळण्यासाठी स्वतंत्र पोलीस सेलची स्थापना करावी. याबद्दल ही परिशद आग्रही आहे.

7. जे तरुण-तरुणी प्रौढवयात लग्न करण्यासाठी स्वतः आग्रही असतील आणि यासाठी ते समाजात जागृती करण्याचा प्रयत्न करतील अशा तरुण-तरुणींचे ही परिशद स्वागतच करेल.

8. आंतरजातीय विवाह, विधवा विवाह, घटस्फोटीतेशी विवाह करण्याला तरुणांनी प्राधान्य द्यावे अशी विनंती ही परिशद तरुण-तरुणींना करते. जे तरुण वरील प्रकारची लग्ने करतील त्यांना संरक्षण देण्यासाठी पुरोगामी विचारसरणीच्या लोकांनी एकत्र येऊन एखाद्या संघटनेची स्थापना करावी, अशी विनंती ही परिशद करते.

9. केन्द्र सरकार आणि राज्यसरकारांनी पाठ्य-पुस्तके आणि अभ्यासक्रम ठरवताना तो अशा प्रकारे तयार करावा की यातून विद्यार्थ्यांवर जातीनिर्मूलनाचे आणि अस्पृश्यतेविरुद्धचे संस्कार होतील आणि सर्व मानव समान दर्जाचे आहेत असा विचार विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होऊन अगदी बालपणापासून मानवतावादी विचार ते करु लागतील. ■ ■

# जात्यांध आणि धर्मांध माथेफिरुंना अतिरेकी घोषित करा

*भारतीय शिक्षक दिन अगदी जवळ येऊन ठेपलेला असताना, उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर जिल्ह्यात परवा एक अमानुष घटना घडली. तृप्ती त्यागी नावाच्या एका धर्मांध माथेफिरू शिक्षिकेने दुसरीच्या वर्गात शिकणाऱ्या मुस्लिम मुलाने गृहपाठ करून आणला नाही, म्हणुन भरवर्गात त्याला विद्यार्थ्यांसमोर उभे केले आणि हिंदू मुलांना त्याच्या थोबाडीत मारायला सांगीतले. शिक्षिकेने सांगीतले म्हणून एका नंतर एक काही हिंदू मुलांनी त्या मुस्लिम मुलाच्या थोबाडीत मारली. या घटनेचे व्हिडीओ चित्रण संपूर्ण देश बघत आहे. निष्पाप, कोवळ्या आणि ज्यांना धर्मातील प्रेम - नफरत ही काय चीज आहे, हे काहीही माहीत नाही, अशा निरागस मुलांसोबत एका शिक्षिकेने अशा धर्मद्वेषी क्रूरतेने वागणे हे मानवतेला काळीमा फासणारे आहे. ही कृती शिक्षकी पेशाचा अवमान करणारी आहे. शिक्षक या पदाला धुळीस मिळवणारी आहे. भविष्यात अशा धर्मद्वेषाचे गंभीर विपरीत परिणाम आणि भयावह पडसाद विद्यार्थींच्या मनात उमटू शकतात. त्यामुळे देशाचे प्रचंड मोठे नुकसानही होऊ शकते, म्हणून अशा घटना समाजात आणि देशात कोणत्याही जात धर्मीय विद्यार्थांसोबत आणि नागरिकांसोबत घडता कामा नयेत. तसेच अशा घटनांची पाठराखणही होता कामा नये, असे मला वाटते म्हणून मुझफ्फरनगर येथील घटनेचा मी सर्वप्रथम तिव्र निषेध नोंदवतो.*

आपल्या भारतीय संस्कारात आणि संस्कृतीत जसे आई वडिलांचे स्थान हे सर्वोच्च आणि महत्वपूर्ण आहे, तेवढ्याच तोलामोलाचे, मानासन्मानाचे आणि आदरणीय स्थान हे समाजात शिक्षकांचे आहे. आणि त्यातही शिक्षिका म्हणजे तर अगदी साक्षात विद्यार्थ्यांची वर्गातील आईच! प्रेमळ, नम्र, गुणी, आदर्श, सुसंस्कारी, मायाळू, दयाळू, सर्व मुलांना सामावून आणि समजून घेणारी, सर्वांना समान न्यायाने बघणारी, शिकविणारी, दिशादर्शक. म्हणून तर समाजात आई वडीलानंतर त्यांचे स्थान गुरूचे आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला सकारात्मक दिशा देणारे, विद्यार्थ्यांचे सकारात्मक जीवन घडविणारे म्हणजेच देश घडविणारे, एवढे ते महत्वपूर्ण आहेत. अशा विविधांगाने आणि याच भावनेतून आजही आपल्या देशात शिक्षकांकडे बघितल्या जाते. परंतू या आदर्शाला, या कर्तृत्वाला काळीमा फासणारे प्रकार जर शिक्षकांकडूनच घडू लागले तर? या देशातील विद्यार्थ्यांचे कसे होणार? या देशाच्या संविधानिक भवितव्याचे पुढे काय होणार? हे प्रश्न कधी नव्हे एवढे आज देशाला भेडसावू लागले आहेत.

14 ऑगस्ट 2022 रोजी राजस्थानातील जयपूर जिल्ह्यातील जालोर येथील तिसऱ्या वर्गात शिकणारा 9 वर्षांचा निष्पाप दलित विद्यार्थी शिक्षकाच्या मटक्यातून पाणी पिला. या कारणावरून त्या शिक्षकाने विद्यार्थ्यांची मारून मारून हत्या केली. हैदराबाद विद्यापीठातील पीएचडीचा विद्यार्थी रोहीत वेमूलास याच जात्यांध आणि धर्मांध अतिरेकी माथेफिरूंनी आत्महत्येस प्रवृत्त केले. अशा एक ना अनेक घटनांनी देशात सध्या जोर धरला आहे. याला जबाबदार कोण? याला कारणीभूत कोण? काय याला जबाबदार या देशातील जैन धर्मीय आहेत? काय याला जबाबदार या देशातील बौद्धधम्मीय आहेत? काय याला जबाबदार ख्रिश्चन धर्मीय आहेत? काय याला जबाबदार मुस्लिम धर्मीय आहेत? काय याला जबाबदार शिख धर्मीय आहेत? काय पारशी धर्मीय आहेत? काय यांच्या हातून, जात्यांध धर्मांध बनून, अशा घटना घडत आहेत? तर निश्चितच नाही. या उल्लेखीत धर्मीयांकडून अशा अमानवीय, क्रूर आणि राक्षसी घटना निश्चितच घडत नाहीत. मग अशा घटना घडवून आणणारे जात्यांध, धर्मांध माथेफिरू अतिरेकी कोण आहेत? यांच्या मागे कोणाचे विचार, संस्कार आणि कोणाची संस्कृती आहे? कोण आहेत हे जात्यांध धर्मांध माथेफिरू विकृत अतिरेकी? हे कोणत्या जातीतील आहेत? हे कोणत्या धर्मातील आहेत? यांना जातीच्या आणि धर्माच्या नावावरून देशासमोर उघडे करा.

दलित, मुस्लिम, ख्रिश्चन ई. विद्यार्थ्यांना छळण्याचा आधिकार यांना कोणी दिला? विद्यार्थांचा अवमान करण्याचा आणि या ना त्या कारणाने त्यांच्या हत्या करण्याचा आधिकार या जात्यांध, धर्मांध माथेफिरू अतिरेक्यांना कोणी दिला? उत्तर प्रदेशातील योगी सरकार गुंडाच्या घरावर बुलडोझर चालवून त्या गुंडाच्या गुंडगिरीला मुळासकट उपटून फेकून समाजात शांतता प्रस्थापित केल्याच्या अविर्भावात देशभर डंका पिटत आहे, मग योगी सरकारला माझा सवाल आहे की, देशातील मानवतेची, एकतेची आणि अखंडतेची घडी विस्कळीत करणाऱ्या, देशातील धार्मिक सौहार्द बिघडवणाऱ्या, देशातील बंधुभावाच्या ठिकऱ्या उडविणाऱ्या, देशाच्या शांततेला तडे पाडणाऱ्या, देशाच्या ह्रदयावर धर्मांध दुश्मनीची रेष ओढणाऱ्या, देशाचे धार्मिक तुकडे करणाऱ्या अशा राक्षसी मनोवृत्तीच्या जात्यांध धर्मांध तृप्ती त्यागी सारख्या अतिरेक्यांच्या घरावर बुलडोझर कधी चालवणार? अशा क्रूर, जात्यांध आणि धर्मांध अतिरेक्यांची जागा या देशात आणि समाजात नसून फक्त कारागृहातच आहे, हे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी देशाला केव्हा दाखवून देणार? देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा, अशा धर्मद्वेषमूलक, देशविघातक तमाम प्रवृत्तींना त्यांच्या जातीसह आणि त्यांच्या धर्मासह ‘जात्यांध आणि धर्मांध अतिरेकी घोषित करा.’ आजवर देश हेच ऐकत आला आहे की, गुंडांना आणि अतिरेक्यांना जात आणि धर्म नसतो. परंतू देशवासियांचा आता यावर विश्वास बळावताना दिसून येत आहे की, जातीत पण अतिरेकी आहेत. धर्मात पण



अतिरेकी आहेत. अतिरेक्यांनाही जात असते, अतिरेक्यांनाही धर्म असतो आणि त्यांचा स्वार्थी धर्म वर्चस्व स्थापण्यासाठी ते अतिरेकी कारवाया करीत असतात. यासाठी ते देशाचाही बळी देत असतात. तर या अतिरेक्यांची पाठराखण करणारेही जात्यांध आणि धर्मांध अतिरेकीच असतात, हे नथूराम गोडसेपासून ते आजवर विविध देशविघातक बाबीत संपूर्ण देश बघत आला आहे. उच्च जात, उच्च वंश, धर्म, लिंग अशा विकृत आणि विषम परंपरेतून, वंशाधारित विकृततेतून टोकाच्या अतिरेकी धर्मद्वेषी मानसिकतेतून ते अशा अमानवीय क्रूर अतिरेकी कारवाया करीत आहेत. कधी चोरी केल्याच्या संशयावरून, कधी मांस खाल्ले म्हणून, कधी मंदिरात प्रवेश केला म्हणून, तर कधी खालच्या जातीतील आहेस म्हणून, कधी प्रेम केले म्हणून, तर कधी मैत्री केली म्हणून ई. कारणांवरून सध्या मनुस्मृतीग्रस्त ब्राह्मणाळलेल्या जहरिल्या धर्माच्या झुंडींनी देशभर हैदोस घातला आहे. ते या देशाला मनुचा विषम, विकृत, विद्वेषी वर्चस्व असलेला देश बनवू पहात आहेत आणि यासाठीच ते या अतिरेकी मान मानसिकतेचा वापर देश तोडण्यासाठी करीत आहेत. देशात जाती धर्मावरून द्वेषमूलक वातावरण तयार करणाऱ्या व्यक्ती घटनांना बढावा देत आहेत. अशा धर्मांध माथेफिरूंच्या पाठीशी ते उभे रहात आहेत. ही देशाच्या ऐक्यासाठी अतिशय धोकादायक आणि धक्कादायक अशी बाब आहे. म्हणून भारतीय नागरिक बांधवांनो, जातीच्या आणि धर्माच्या अहंकाराच्या अंधकारातून बाहेर पडा.

जातीवर धर्मावर आभिमान बाळगू नका. आपली जात आणि धर्म घरात ठेवा. रस्त्यावर उतरवू नका. शाळेत डोकावू नका. मंदिरात घुसू देऊ नका. या पृथ्वीतलावर कोणी उच्च नाही आणि कोणी निचही नाही. ही भावना, अशी मानसिकता केवळ मनुवादी षडयंत्रकाऱ्याने स्वतःचे सत्तावर्चस्व निर्माण करण्यासाठी आणि त्यावर राज्य करण्यासाठीच मात्र राबवत आहेत. म्हणूनच ते हिंदू खतरेमे है म्हणत आहेत आणि तुमचा त्यात बळी जात आहे. निसर्ग निर्मित मानव तिथून एक आहे. जात धर्म तुमच्या डोक्याला लागलेली कीड आहे. धर्मद्वेषाच्या अंधभक्तीतून बाहेर पडा. देशाच्या हिताचे वागा. जाती धर्मावरून एकमेकांविरुद्ध राग, द्वेष, घृणा, मत्सर, चिड, तुच्छता हा अमानवीय स्वभाव त्यागा. लक्षात ठेवा अशा जातीभेद युक्त आणि धर्मभेद युक्ताचा इतिहास अतिशय क्रूर आणि रक्तरंजीत आणि अमानुष आहे. एक वंश, एक धर्म, एक भाषा, एक संस्कृती, एक प्रभुत्वं असलेले लोकच या देशात राहू शकतात, या देश भेदणाऱ्या षडयंत्रकारी मानसिकतेतून बाहेर पडा. तुम्ही शिक्षक आहात. देशाचे रक्षक. ■ ■

ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

# संविधान बदलण्याची संघ व भाजपाची पुन्हा दर्पोक्ती

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष बिबेक देबरॉय यांनी एक लेख लिहिला असून त्यात त्यांनी देशाला नवीन संविधान देण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. देबरॉय यांनी आपल्या लेखात लिहिले आहे की, ‘‘आपली सध्याची राज्यघटना मुख्यत्वे 1935 च्या भारत सरकारच्या कायद्यावर आधारित आहे. त्या अर्थाने हा एक वसाहतवादी वारसाही आहे. 2002 मध्ये राज्यघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाचा अहवाल आला होता; पण तो अर्धवट प्रयत्न होता.’’

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष विवेक देबरॉय यांनी राज्यघटनेसंदर्भाने लिहिलेल्या लेखामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. या लेखावरून जेडीयू आणि राजदने भाजपवर हल्लाबोल केला आहे. जेडीयूचे राष्ट्रीय सचिव राजीव रंजन म्हणतात की, ‘‘बिबेक देबरॉय यांनी जे म्हटले आहे त्यामुळे भाजपची घृणास्पद विचारसरणी पुन्हा समोर आली आहे. भारतातील जनता असे प्रयत्न हाणून पडल्याशिवाय राहणार नाही. भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटना असून बिबेक देबरॉय सत्ताधाऱ्यांची चमचेगिरी करत आहेत. बिबेक देबरॉय आर्थिक धोरणांवर आपले मत कधीच व्यक्त करू शकत नाहीत, कारण त्यातली त्यांना फारसी जाण नाही, परंतु इतर क्षेत्रांविषयी त्यांचा संबंध नसूनही असे नादानपणाचे विचार मांडत आहेत. या संदर्भात राष्ट्रीय जनता दलाचे (आरजेडी) नेते आणि राज्यसभेचे खासदार मनोज झा म्हणतात की, ‘हे बिबेक देबरॉय यांच्याकडून सत्ताधाऱ्यांनी वदवून घेतलेले विचार आहेत. साचलेल्या पाण्यात दगड टाका आणि तरंग उठत असतील तर आणखी टाका आणि मग म्हणा की ही




मागणी जनतेमधूनच येऊ लागली आहे. घटनात्मक मूल्य त्यांना निरपेक्ष हुकूमशाहीचा परवाना देत नाही याचे शल्य त्यांना बोचते आहे. घटनादुरुस्ती आणि संपूर्ण राज्यघटनाच बदलने यात खूप फरक आहे. मोदींच्या देशात विषमता शिगेला पोहोचली आहे. राज्यघटनेत नव्हे तर कायद्यात बदल करण्याची गरज आहे. त्यांना असा कायदा करायचा आहे, जिथे सत्ताधीशांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द हा कायदा असला पाहिजे. केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून त्यांचे मंत्री, लोकप्रतिनिधी आणि नेते वेळोवेळी अशी विचित्र वक्तव्य करत आहेत. कधी देशाच्या राजकीय व्यवस्थेबद्दल कुणी काही बोलते, कधी संविधानाबद्दल काही बोलतात, तर कधी समाजातील दुर्बल आणि अल्पसंख्याक घटकांना धमकावतात. अशा प्रकारच्या शाब्दिक अराजकावरील मौन बेजबाबदार लोकांना प्रोत्साहन देत आहे. देशात जणू हुकूमशाही सुरू आहे आणि भाजप नेत्यांना आयुष्यभर येथे राज्य करण्याचा अमरपट्टा बहाल करण्यात आला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यांच्या अनावश्यक वक्तृत्वावर कोणाचेही नियंत्रण नाही. प्रधानमंत्रांनी एकदा यावर टीका केली आहे, पण त्यानंतर ते अनेकदा गप्प बसले आहेत. खरे तर राज्यघटनेचा पुनर्विचार करणे हा आरएसएसचा छुपा अजेंडा आहे. हे वारंवार सिद्ध होत आहे.

**संविधान बदलण्याचा आरएसएस व भाजपचा अजेंडा काही नवीन नाही. भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागारांनी नुकतीच एका वर्तमानपत्रात लेख लिहून संविधान बदलन्याची दर्पोक्ती व्यक्त केल्याबद्दल काही विरोधकांनी याविरोधात टीकेची झोड उठवली असून भाजपची मनुवादी विचारसरणी समोर आली असल्याचे म्हटले जात आहे. यावर ना आरएसएसकडून ना भाजप सरकारकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली आहे.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत एकदा म्हणालेच होते की, ‘भारतीय समाजाच्या नैतिक मूल्यांना अनुसरून भारतीय राज्यघटनेत सुधारणा करण्यात यावी.’ हैदराबाद येथील एका कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले होते की, ‘राज्यघटनेतील अनेक भाग परकीय विचारसरणीवर आधारित आहेत आणि ते बदलण्याची गरज आहे. स्वातंत्र्याच्या 70 वर्षांनंतर याकडे लक्ष द्यायला हवे.’’ याचा अर्थच असा आहे कि राज्यघटनेचा पुनर्विचार हा संघाचा छुपा अजेंडा आहे.

संघाला वाटते कि वेळोवेळी राज्यघटना बदलली जाते, त्यात अनेकवेळा सुधारणा केल्या जातात; परंतु प्रश्न असा आहे की संघ कोणत्या प्रकारच्या बदलांबद्दल बोलत आहे, त्यांना धर्मनिरपेक्ष संविधान रद्द करून हिंदुराष्ट्र निर्माण करायचे आहे. त्यांच्या या मनसुब्याला घटनेनुसार अजिबातच परवानगी नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमध्ये म्हटले आहे की धर्मनिरपेक्षता हा भारतीय राज्यघटनेचा मूलभूत आधार आहे आणि तो बदलता येणार नाही. त्यांच्याकडे दोन तृतीयांश बहुमत असले तरी मूळ आधार नष्ट होईल अशा पद्धतीने राज्यघटना बदलता येणार नाही. धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेचा मूलभूत आधारस्तंभ मानला गेला आहे; परंतु लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्यासह जयपूरमध्ये विधिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील न्यायालयीन अतिक्रमणाचा प्रश्न ज्या पद्धतीने उपस्थित केला, तो सामान्य नाही. पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेला संबोधित करताना या दोघांनी सांगितले की, जसे विधिमंडळ न्यायालयीन निर्णय देऊ शकत नाही, त्याचप्रमाणे न्यायपालिकेनेही कायदे बनविण्याचे अधिकार हिरावून घेण्याच्या प्रयत्नांपासून दूर राहिले पाहिजे. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड हे स्वतः चांगले वकील असून त्यांनी सर्वोच्च न्यायालयात वकिलीही केली आहे. अशा परिस्थितीत राज्यघटनेच्या मूलभूत रचनेच्या अखंडतेशी संबंधित बहुचर्चित केशवानंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल चुकीचा आदर्श घालून देतो, या त्यांच्या म्हणण्यात खूप काही दडले आहे. लोकशाहीत संसद सर्वोच्च असते, अशा परिस्थितीत संसदेत संमत झालेला कायदा इतर कोणत्याही संस्थेने अवैध ठरवला तर संसदीय वर्चस्व कुठे राहते? असा त्यांचा युक्तिवाद आहे.

दुसरे म्हणजे संसदीय सर्वोच्चतेचे तत्त्व असो वा न्यायपालिकेचे स्वातंत्र्य, भारतीय शासनव्यवस्थेच्या संदर्भात या सर्वांचा मूळ स्त्रोत म्हणजे देशाची राज्यघटना. शासनाचे सर्व महत्त्वाचे अंग संविधानातूनच शक्ती प्राप्त करतात. त्यामुळे राज्यघटनेचे सर्वोच्चत्व निसंदिग्ध आणि निर्विवाद आहे.

**क्रमशः** ■ ■

## सामाजिक चळवळीचे ऐतिहासिक कॅलेंडर

**4 सप्टेंबर**



एकनाथ सोमकुवर
9423678960

१. डॉ. बाबासाहेब ४ सप्टेंबर १९२१ रोजी लंडनहून शाहू महाराजांना पाठविलेल्या पत्रात म्हणतात, ‘महाराजासाहेब, आपण भारतात होऊ घातलेल्या सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ आहात. त्यामुळेच आपली या देशाला नितांत गरज आहे.’

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईला ४ सप्टेंबर १९२७ रोजी समता समाज संघाची स्थापना केली. संघाचे ध्येय होते की सर्व मनुष्यप्राणी समान आहेत आणि त्यांना जीवनात समान संधी मिळावी.

समता समाज संघाचे पदाधिकारी डॉ. आंबेडकर, डॉ. आर. एन. भाईदरकर, डी. व्ही. नाईक, एस. एस. गुप्ते इत्यादी होते. संघाचे मुखपत्र ‘समता’ नावाचे पाक्षिक दि. २९ जून १९२८ पासून सुरू केले. देवराव नाईक हे संपादक होते. बाळ गंगाधर टिळकांचा मुलगा श्रीधरपंत टिळक संघाचे उत्साही कार्यकर्ते होते. ■ ■

# दोन वर्षे राष्ट्रवादीला मुख्यमंत्रिपद अपेक्षित होते

## मात्र उद्धव ठाकरे यांनी मौन पाळले : प्रफुल पटेलांचा नवा गौप्यस्फोट





**नागपूर :** 'ज्या अडीच वर्षांसाठी शिवसेनेने (उद्धव ठाकरे गट) भाजपशी काडीमोड घेतला, तीच मागणी आम्ही केली असता उद्धव ठाकरे यांच्यासह अन्य नेते मौन होते', अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) पहिलाच संकल्प मेळावा डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात झाला. याद्वारे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी शक्तिप्रदर्शन केले. यावेळी बोलताना प्रफुल्ल पटेल यांनी सत्तेत सहभागी होण्याची भूमिका मांडली. 43 आमदारांचे लाभलेले बळ, पक्षाची मान्यता व चिन्ह अबाधित राहील, अशी ग्वाही देत मनातील किंतू-परंतु दूर करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. सुमारे 45 मिनिटांच्या भाषणात त्यांनी आतापर्यंत पक्षाला कसे दुय्यम स्थान मिळत गेले, याचाही उल्लेख केला.

शिवसेनेचे 56 आणि आपले 54 होते. याआधारे अडीच नाही तर किमान दोन वर्षे राष्ट्रवादीला मुख्यमंत्रिपद अपेक्षित होते. उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेलो असता त्यावेळी तोंड उघडण्यास ते तयार नव्हते. त्यावेळी आदित्य ठाकरे व संजय राऊतदेखील उपस्थित होते. मात्र, कुणीही बोलले नाही. राष्ट्रवादीला अनेकवेळा संधी आली. मात्र, प्रत्येकवेळी आपण गमावली.

काँग्रेसने सुरुवातीपासून झुकते माप घेतले व आपल्याला ठराविक जागा दिल्या. प्रत्येकवेळी आम्ही माघार घ्यायची का, पहिल्या क्रमांकावर येण्याची आशा बाळगायची नाही का', असे सवाल करून 'भाजपकडून पूर्ण न्याय मिळणार आहे. यापुढे आपला पक्ष अधिक बळकट करू' असे पटेल यांनी सांगितले. 'पक्षाचे नाव, चिन्ह मिळेल की नाही, याची चिंता करू नका. आपल्यासोबत 43 आमदार आहेत. आणखी येतील. बहुसंख्य कार्यकर्ते सोबत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग योग्य निर्णय घेईल. काटोल-नरखेडमधील इतरांना आधी जागा मिळायची का? पक्षाने अनेक नेत्यांना बळ दिले. पण, त्यांनी इतरांना संधी दिली नाही व दुसरी फळी तयार केली नाही, ही शोकांतिका आहे', असे पटेल म्हणाले.

जागांच्या वाटाघाटीत निम्म्या जागांची मागणी करावी. अनेक जिल्ह्यांत पक्षाचे बळ आहे. त्यातून आपल्या जागा वाढतील, असे सांगून अन्न व औषध प्रशासनमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी गडचिरोली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली. शहराध्यक्ष प्रशांत पवार यांनी घरोघरी राष्ट्रवादी अभियानातून पक्ष बळकट करण्याची ग्वाही देऊन शहरातील विविध प्रश्नांकडे पटेल यांचे लक्ष वेधले. जिल्हाध्यक्ष बाबा गुजर यांनी ग्रामीणमध्ये कार्यकर्त्यांवर कसा अन्याय होत गेला, याची माहिती दिली.

महिला आयोगाच्या सदस्य आभा पांडे, प्रदेश उपाध्यक्ष अनिल अहिकर, सरचिटणीस ईश्वर बाळबुधे, शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांचेही भाषण झाले. राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष विशाल खांडेकर व कार्याध्यक्ष रवी पराते यांच्यासह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. व्यासपीठावर सतीश शिंदे, सुनील फुंडे, अरविंद भाजीपाले आदी उपस्थित होते. यावेळी आप, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

ज्यांच्यामध्ये साधा लोगो ठरविण्याबाबत एकमत होऊ शकत नाही, संयोजक ठरवता येत नाही, 13 जणांची समिती करावी लागते, शक्य असेल तिथे एकच उमेदवार उभा करू, अशी शक्य-अशक्यची भाषा बोलावी लागते त्या 'इंडिया'मध्ये ऐक्य कसे होणार, ते एकत्र कसे लढणार', असा हल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी चढवला.

नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या मीट द प्रेस कार्यक्रमात बोलताना महायुतीत सहभागी होण्यासह विविध मुद्द्यांवर त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली. संसदेच्या विशेष अधिवेशनाची विषयपत्रिका अद्याप आलेली नाही. नेमकी कशावर चर्चा होईल, हे पत्रिका आल्यावरच कळेल. पाच दिवस अधिवेशन चालणार असल्याने विरोधी पक्षाने आता चर्चा करावी, असा टोलाही प्रफुल्ल पटेल यांनी लगावला. शरद पवार आमचे दैवत आहे. त्यांच्यावर आम्ही बोलणार नाही, हे आधीच ठरवले आहे, असे सांगून प्रफुल्ल पटेल यांनी प्रश्नांना बगल दिली.

# आंदोलनापूर्वीच प्रमुख नेते ताब्यात शेकडो आंदोलक स्थानबद्ध



**बुलढाणा :** जालना येथील लाठीमाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीतर्फे आज रविवारी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यापूर्वी बुलढाण्यासह काही ठिकाणी आघाडीच्या प्रमुख नेत्यांना आंदोलनापूर्वीच पोलिसांनी निवासस्थानातून ताब्यात घेतले. दरम्यान, आघाडीतर्फे आज रविवारी सकाळी रास्ता रोकोचे आयोजन करण्यात आले होते. पोलिसांनी आंदोलकांना लगेच स्थानबद्ध केले.

महविकास आघाडीने आज रास्ता रोको आंदोलनाची घोषणा केली होती. सकाळी दहा वाजेच्या सुमारास प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन होणार होते. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री 'शासन आपल्या दारी'निमित्त बुलढाण्यात येणार असल्याने बुलढाणा शहर पोलिसांनी आघाडीच्या नेत्यांसह सुमारे 35 आंदोलकाना ताब्यात घेतले आहे.

## महत्वाचे

### आंबेडकराईट्स बुद्धीस्ट सोसायटीतर्फे धम्म संस्कार शिबिराची सांगता



**नागपूर :** आंबेडकराईट्स बुद्धीस्ट सोसायटीतर्फे त्रिशरण बुद्ध विहार येथे एक दिवसीय धम्म संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मार्गदर्शन आंबेडकराईट्स बुद्धीस्ट सोसायटीचे संस्थापक ॲड. रवि डंभारे आणि अन्य पदाधिकारी यांनी केले. यावेळी 22 प्रतिज्ञावर आधारित नवीन समाज निर्माण कसे करावे, डॉ. बाबासाहेबाचे विचारांचा धम्म कसा आहे, बौद्धांचे सण, संस्कार कोणते यावर चर्चासत्र आयोजित करण्यात आली. या कार्यकमात शुभम डाहाट, मुरती डोंगरे, चंद्रकात बोंधाटे, निर्वाण डंभारे, शितल डाहाट, अर्चना डोंगरे, मयूरी डाहाट यानी परिश्रम घेतले. परिसरातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

### भारतीय बौद्ध महासभा बुद्ध विहार मोठा इंदोरा येथे धम्मादेसना




**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा,व बोधी मित्र ग्रुप शाखा बुद्ध विहार मोठा इंदोरातर्फे बुद्ध विहार मोठा इंदोरा येथे भिक्षुनी धम्मनंदा भिक्षुनी उपल वण्णा, भिक्षुनी धम्मसुधा यांच्या व शाखेचे अध्यक्ष विजय देशभ्रतार यांच्या प्रमुख उपस्थितीत धम्मादेसना कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमात शाखेचे सरचिटणीस मिलिंद मेश्राम, भगवान देशभ्रतार, देवानंद पानतावणे, सुरेश मेश्राम, चंद्र मेश्राम, अरविंद देशभ्रतार, मनोहर उके, सुरेंद्र राऊत, आभासकुमार देशभ्रतार, विकास बारमाटे, सुनयना देशभ्रतार, शालिनी पानतावणे, शालिनी मोडक, साची पानतावणे, सुधा मेश्राम, कविता मेश्राम, अर्चना मेश्राम, वैशाली देशभ्रतार, शीला मेश्राम, वंदना लांडगे, विश्रांती बारमाटे, एकता रामटेके, नम्रता खांडेकर, उषा मेश्राम, मोहनाबाई पाटील, प्रमिला मोरे, नंदा मेश्राम, स्नेहल देशभ्रतार इत्यादी धम्मसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### साडेतीनशे बसेसने लाभार्थी पोलिस संरक्षणात बुलढाण्यात दाखल



**बुलढाणा :** बुलढाण्यात आज रविवारी आयोजित शासन आपल्या दारी या कार्यक्रमासाठी एसटी महामंडळाच्या 341 बसची सेवा घेण्यात आली. बुलढाणा ते मलकापूर राज्यमार्गावरील कऱ्हाडे ले-आऊटमध्ये हा जंगी शासकीय सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी भव्य 'वॉटर रूफ' शामियाना उभारण्यात आला आहे. याठिकाणी हजारो लाभार्थ्यांसाठी विशेष कक्ष (कंपार्टमेंट) तयार करण्यात आले आहे. जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांना बुलढाण्यात आणण्यासाठी 341 बसची व्यवस्था करण्यात आली. जिल्ह्यातील 7 आगारातील या बस लाभधारकाना घेऊन आज रविवारी सकाळी 13 तालुक्यातून निघाल्या. आघाडीच्या रास्ता रोकोमुळे थांबविण्यात आल्यावर बंदोबस्तावरील पोलिसांनी त्यांची 'सुटका' करून लगेच बुलढाण्याकडे रवाना केले.

# काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेस आरंभ



**वर्धा :** प्रदेश काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेस आज आष्टी शहीद येथून आरंभ झाला. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व सहकाऱ्यांनी येथील शहीद स्मारकास अभिवादन करीत पदयात्रा सुरू केली.यावेळी आमदार सुनील केदार, माजी आमदार अमर काळे, प्रदेश उपाध्यक्ष चारुलता टोकस, जिल्हाध्यक्ष मनोज चांदूरकर, शेखर शेंडे, नाना गावंडे, झिया पटेल, प्रवीण हिवरे, प्रमोद हिवाळे व अन्य सहभागी झालेत. मात्र, आमदार रणजित कांबळे यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली.

यावेळी बोलताना पटोले म्हणाले की, 50 टक्के आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. पण मोदी सरकारला कोणाचंच भले करायचे नाही. ओबीसींचे आरक्षण मराठा समाजाला देण्याचे काम सुरू आहे. दोन समाजात भांडणे लावून पुन्हा सत्तेवर येण्याचा प्रयत्न भाजप करीत आहे. ही यात्रा 12 सप्टेंबरला सेवाग्राम येथे पोहोचणार आहे. आज यात्रेत लक्षणीय संख्येने काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

# अंनिसचे ताराचंद पखिडे यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा




**नागपूर (संवाद मित्र गौरव आळणे):** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कोराडी शाखेचे अध्यक्ष ताराचंद पखिडे यांनी गोधनी येथील विल्किन्सन शाळेतील विद्यार्थ्यांना सहा हजार चारशे रुपयांची राशी दान देऊन 68 वा जन्मदिवस साजरा केला. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना विज्ञानाचे प्रात्यक्षिके दाखवून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मधुकर धंदरे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सातत्याने राबवित असलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जडणघडण होत असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा अध्यक्ष जगजीतसिंग यांनी हवेच्या दाबाचा प्रयोग करून दाखविला दाखवीत विद्यार्थ्यांची मने जिंकली. विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संदेश देण्याकरिता नशाबंदी मंडळातर्फे पोस्टर्स प्रदर्शनीदेखील लावण्यात आली होती.

सत्कारमूर्ती ताराचंद पखिडे यांनी जन्मदिनी दिलेली राशी एका आगळ्यावेगळ्या छंदामधून गोळा केल्याचे किस्से सांगितले. ते दररोज 11 किलोमीटर राष्ट्रीय महामार्गावरून उजव्या बाजूने मॉर्निंग वॉक करीत असतात. हे करताना पाच वर्षामध्ये सापडलेल्या राशीमध्ये वाढदिवसाला भेट आलेली राशीदेखील समाविष्ट करून विद्यार्थ्यांना मदतीचे दान केले. मंचावरुन सुप्रसिद्ध गायिका मानसी भांदककर यांनी विद्यार्थ्यांचे राहणीमान उंचावण्याकरिता समाजातील धनाढ्य घटकांकडून अधिक मदतीची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता रवी पाचभावे, प्रशांत सहारे, विनायक मानवटकर, धनराज टिपले, भागीरथी पखिडे, चेतन शेलोकर, रोशनी जुमळे, निहाल पाटील, स्नेहल पाटील आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन शाखा कोराडी शाखा प्रधान सचिव विलास भालेराव यांनी केले तर आभा जिल्हा प्रधान सचिव विनोद उलीपवार ली पवार यांनी मानले.

# रक्षा सूत्र हे बंधन नाही तर जबाबदारी आहे: धम्मपाल




**नागपूर :** जयभीम मित्रमंडळातर्फे पिरॅमिड सिटी-3, क्लब हाऊस, बेसा, नागपूर येथे श्रावण पौर्णिमा (रक्षासुत्त) उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात नागा संस्कृतीतील रक्षासुत्त पौर्णिमेचे महत्त्व विषयवार लेखक, इति. धम्मपाल देशभ्रतार म्हणाले, ई.पू. 2100 मध्ये पुरुषनी नदी मैदानावरील दसराज युद्धात महानाग सुदासचा विजय झाला तेव्हा सर्व पराभूत राजांनी श्रावण पौर्णिमेच्या दिवशी त्यांचा कलाईवर रक्षासूत्र बांधून संरक्षण मागितले. ई. पू. 1600 मध्ये महानाग तक्षकाने दहाव्यांदा परीक्षिताचा पराभव केला तेव्हा सर्व जंबुद्वीपाच्या राजांनी श्रावण पौर्णिमेच्या दिवशी त्याच्या मनगटावर रक्षासूत्र बांधून संरक्षण मागितले. ई.पू. 544 मध्ये, सिद्धार्थ गौतमला खीर अर्पण केल्यानंतर, राणी सुजाता यांनी वटवृक्षाच्या (न्याग्रोथ) तन्यावर धाग्याचे नऊ फेरे बांधून संरक्षण मागितले होते. ई.पू. 483 मध्ये, मगधचा राजा अजातशत्रू याने बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर चार महिन्यांनी पाटलीपुत्रच्या सप्तपर्णी गुहेत पहिली बौद्ध धम्म संगीती आयोजित केली. 84 हजार धम्मसूत्रांची रचना लिहिण्याचा उद्देश होता जेणेकरून ते संग्रहित आणि सुरक्षित करता यावी. रक्षाबंधन श्रावण पौर्णिमेपासून सुरू झालेला हा कार्यक्रम एक वर्ष चार महिने पिटके लिहले गेले. सध्या भारतभर भाऊ-बहिणीचा रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला जातो. विशेष अतिथी डॉ. एन. व्ही. ढोके यांनी आपले मनोगत मांडले.

अध्यक्षस्थानी शरद घोडके होते. संचालन संदीप रामटेके यांनी केले. कार्यक्रमात पद्माकर गजभिये, विजय रामटेके, राकेश पाटील, आर. आर. पाटील, सतीश वाघमारे, संदीप नागदेवते, विकासा धावडे, चंद्रशेखर खांडेकर, अरविंद तायडे, रघुनाथ ढेपे आणि प्रशांत निलाटकर इत्यादि उपस्थित होते.

## सत्यशोधक विचार या विषयावर आज

**नागपूर :** सत्यशोधक प्रबोधिनी, बहुजन संघर्ष समिती, राष्ट्रीय ओबीसी महासंघ व नवउन्मेशन साहित्य सभा या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. 4 सप्टेंबर 2023 रोजी सायं. 5 वाजता, शिवाजी सभागृह, दत्तात्रयनगर नागपूर येथे होत आहे.

सत्यशोधक विचार या विषयावर नागेश चौधरी-संपादक बहुजन संघर्ष लोकशाहीचे आद्य प्रवर्तक म. बसवेश्वर या विषयावर सुधा बामनपल्लीवार, भारतीय संविधानाचे ओबीसी लोकांसाठी महत्व या विषयावर प्रा. शरद वानखेडे व अंधश्रध्दा निर्मूलनाची गरज या विषयावर मधुकरराव धंदरे गुरूजी मांडणी करतील. असे संयोजक विनोद उलीपवार यांनी कळविले आहे.

# नागपुरात वादळामुळे झाडे पडली



**नागपूर :** संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेल्याने पिके संकटात सापडली होती. वातावरणातील उकाड्यामुळे नागरिकही त्रस्त झाले होते. प्रत्येकाचे डोळे पाऊस कधी येतो याकडे लागले होते. अखेर रविवारी दुपारपासून विदर्भात नागपूर, चंद्रपूर, वर्धासह अनेक ठिकाणी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. नागपुरात वादळामुळे अनेक ठिकाणी झाडे पडली व वातावरणातील उष्मा कमी झाला. वर्धा जिल्ह्यात करंजी भोगे या गाात वीज पडून एक म्हैस ठार झाली.

ऑगस्ट महिन्यात काही दिवसांचा अपवाद सोडला तर पावसाने दडी मारली होती. ग्रामीण भागात पिके करपायला लागली होती. पाऊस पडला नाही तर काय या चिंतेत शेतकरी होते. दुसरीकडे शहरी भागात उकाड्यामुळे जनजीवन त्रस्त झाले होते. बंद केलेले कुलर्स पुन्हा सुरू झाले होते. प्रत्येकाचे डोळे पावसाकडे लागले होते. रविवारी दुपारी आकाशात ढगांनी गर्दी केली व नागपुर, वर्धा व अन्य ठिकाणी पावसाला सुरूवात झाली. नागपुरात अल्पकाळच झालेल्या वादळी पावसाने अनेक ठिकाणी झाडे पडली तर वातावरणातील उष्मा कमी झाला.

वर्धा जिल्ह्यात दुपारी जोरदार पाऊस झाला. ठिकठिकाणी जनजीवन ठप्प झाले. करंजी भोगे तालुक्यात वीज पडून म्हैस ठार झाली. छोट्या नाल्यांना पूर आल्याने काही ठिकाणी वाहतूक खोळंबली. शहरातही जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यातील सेलू, देवळी, समुद्रपूर या तालुक्यात पाऊस सुरूच आहे. चंद्रपूर जिल्ह्यातही अनेक भागात पावसाने हजेरी लावली.

# विहारात एकत्र आल्यास बंधुत्व निर्माण होते : डॉ. सिरसाट



**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रंगुन ( काठमांडु ) येथे जागतीक धम्मपरिषदेत बौद्ध भिक्खु द्वारा बोधीसत्व उपाधी प्रदान केली.या जागतीक धम्मपरिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बुद्ध तत्वज्ञानावरील केलेले सखोल संबोधन महान प्रभावी ठरले.जगाच्या पाठीवर ज्ञानीयाचं विध्यापीठ म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना गौरविण्यात आले ही जगातील अद्वीतीय घटना म्हणावी लागेल. अनेक राष्ट्रातील दीग्गज संशोधकांनी बुद्ध तत्वज्ञान जगासमोर मांडले याचा ऐतीहासीक पुरावा अधोरेखीत करणारा आहे.

त्याचाच भाग म्हणुन आपण बुद्ध विहारात सातत्याने आल्यास व बुद्धाची थेयरी तसेच त्रिपीटकाचे संगायन केल्यास बुद्धाचं तत्वज्ञान चिरकाल टीकेल.

खिरपुरी येथील बुद्ध विहारात धम्मग्रंथ वाचनाचे निमीत्ताने ज्येष्ठ उपासक डॉ. बी. झेड सिरसाट यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले कि, ग्रंथ वाचन असतांना त्या कालावधी पुरतेच आपण विहारात येत असतो नंतर आपण विहारात येत नसतो. बाबासाहेब लिखित विविध ग्रंथसंपदा उपलब्ध असतांना अशाही संदर्भग्रंथाचे आपण वाचन केले पाहीजे म्हणजे विहारात येण्याचं सातत्य कायम राहील व युवा युवती यांचेवर योग्य संस्कार रुजतील असा संदेश बी. झेड. सिरसाट यांनी दिला.

या प्रसंगी उत्कृष्ठ ग्रंथवाचक मोहन बळीराम सिरसाट तथा ग्रंथ विष्लेषक हर्षवर्धन पांडुरंग सिरसाट हे प्रामुख्याने आपली कार्य तत्परता पार पाडीत असतात. ग्रंथ श्रवण करण्यास डॉ. बी. झेड. सिरसाट, तेजराव सिरसाट, मोहन राजाराम सिरसाट, निरंजन सिरसाट (सभापती)रविंद्र इंगळे, राहुल सिरसाट, गोपाल सिरसाट, देवराव सिरसाट, संजय दशरथ सिरसाट, सुजाता महीला संघ-रुखमीनी सिरसाट, बुद्धकन्या, लीला वानखडे, चंद्रसेना सिरसाट, पंचफुला सिरसाट, बेबीबाई सिरसाट, कांता गवई, बेबी वि. सिरसाट, शशीकला सिरसाट, सुमन मोहन सिरसाट, नंदीनी उमेश सिरसाट, सुभद्रा सिरसाट, दिव्या गोवर्धन सिरसाट व इत्यादी उपासक उपासिकांची उपस्थिती होती.




बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - ४४००१६ येथे मुद्रित केले व ९/२, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-४४००२७, येथे प्रकाशित केले.
RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016,
Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648